संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ
अमरावती - ४४४ ६०२
(महाराष्ट्र)

✆ : २६६२२०६, २६६२२०७, २६६२२०८, २६६२२४९, २६६२३५८ फॅक्स : ०७२१-२६६०९४९, २६६२१३५ ग्राम : अमुनि
वेबसाईट : www.sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/७-ड/ ४८६ /२०१३
दिनांक : ०८ मार्च, २०१३

प्रति,
प्राचार्य,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित
आणि विद्यापीठ अनुदान आयोग कलम २ एफ आणि
१२ बी अंतर्गत मान्यताप्राप्त सर्व महाविद्यालये.

विषय : एफ.डी.पी. अंतर्गत Teacher Fellowship करीता निवड झालेल्या शिक्षकांना त्वरीत कार्यमुक्त करण्याबाबत.

महोदय/महोदया,

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Faculty Development Programme अंतर्गत Teacher Fellowship करीता आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांचे प्रस्ताव मंजुरीकरीता विद्यापीठामार्फत यु.जी.सी. ला पाठविण्यात येतात. यु.जी.सी. ला पाठविलेल्या प्रस्तावापैकी काही शिक्षकांना एफ.डी.पी. अंतर्गत Teacher Fellowship मंजुर होतात सदर मंजुरीचे पत्र यु.जी.सी. कडून परस्पर संबंधित महाविद्यालयांना पाठविले जातात त्यामुळे त्याची माहिती विद्यापीठाकडे उपलब्ध होत नाही. याबाबत असे निदर्शनास आले आहे की, यु.जी.सी कडून एफ.डी.पी. अंतर्गत Teacher Fellowship करीता निवड झालेल्या शिक्षकांना संबंधित महाविद्यालय दोन-दोन वर्ष कार्यमुक्त करत नाही. यासंदर्भात विद्यापीठाच्या दिनांक १०.११.२०१२ च्या अधिसभेमध्ये सदस्यांनी प्रश्न उपस्थित करून त्यावर अधिसभेने गंभीर दखल घेतली आहे.

तसेच "विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे एफ.डी.पी. अंतर्गत शिक्षकांची निवड झाली परंतू प्रतिनियुक्तीवर अर्हताधारक शिक्षक मिळत नसल्यामुळे निवड झालेल्या शिक्षकांना व्यवस्थापन कार्यमुक्त करीत नाही. प्रतिनियुक्ती करतांना अर्हताधारक शिक्षकांची आवश्यकता नाही. जाहिरात दिल्यानंतर Ad-hoc basis वर व्यवस्थापनाला रु. ११,०००/- प्रति माह शिक्षक भरता येते. विद्यापीठ अनुदान आयोगाची ११ वी पंचवार्षिक योजना संपल्यावर एफ.डी.पी. बंद पडेल आणि त्यांचे नुकसान होईल म्हणून महाविद्यालयांना हे कळविण्यात यावे". असेही अधिसभेमध्ये ठरले असून यासंदर्भात विद्यापीठाने कायमस्परूपी धोरण ठरवावे. असे अधिसभेमध्ये ठरले. त्यानुसार विद्यापीठाने खालील प्रमाणे धोरण ठरविले आहे.

१) विद्यापीठाअंतर्गत F.D.P. योजनेअंतर्गत निवड झालेल्या शिक्षकांना १ महिन्याचे आंत संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी कार्यमुक्त करावे.
२) F.D.P. योजनेअंतर्गत निवड झालेल्या शिक्षकाचा जो विषय असेल त्या विषयाची जाहीरात १५ दिवसाचे आंत आरक्षण निर्धारण करण्यासाठी प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठवावा.
३) आरंक्षण निर्धारण झाल्यानंतर ८ दिवसात विद्यापीठ कार्यालयाकडून सदर विषयाची जाहीरात मंजूर करून घ्यावी.
४) विद्यापीठाने जाहीरात मंजूर करून दिल्यानंतर त्वरीत वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावी.
५) जाहीरात वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्यानंतर एक महिन्यामध्ये निवड समितीची बैठक बोलावून अर्हताधारक उमेदवाराची निवड करावी.

६) निवड झालेल्या उमेदवाराचा प्रस्ताव त्वरित विद्यापीठाकडे मंजुरीसाठी पाठवावा.

७) महाविद्यालयाकडून बिनचुक प्रस्ताव आल्यास विद्यापीठाद्वारा ८ दिवसाचे आत निवड झालेल्या उमेदवाराला मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

८) F.D.P. योजनेअंतर्गत प्रस्ताव विद्यापीठास संबंधीत महाविद्यालयाकडून सादर करतेवेळी उपरोक्त अटी बंधनकारक असून त्याचे निवारन/अंमलबजावणी काटेकोरपणे विहीत मुदतीत महाविद्यालयाकडून करण्यात येईल, अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल. त्याशिवाय महाविद्यालयाकडून प्राप्त प्रस्ताव स्विकारल्या जाणार नाहीत.

९) शिक्षकांचे एफ.डी.पी. अंतर्गतचे प्रस्ताव सादर करतेवेळी यु.जी.सी. कडून शिक्षकांना Teacher Fellowship करीता निवड झाल्यास शिक्षकांना एक महीन्याचे आत कार्यमुक्त करण्यात येईल. असे महाविद्यालयांनी प्रस्तावासोबत **हमीपत्र** विद्यापीठास सादर करणे बंधन कारक राहील. त्याशिवाय एफ.डी.पी. चे प्रस्ताव यु.जी.सी. कडे पाठविल्या जाणार नाही.

१०) Teacher Fellowship करीता निवड झालेल्या शिक्षकांच्या जागेवर बदली शिक्षकांची नियुक्ती करावी. बदली शिक्षकांची नियुक्ती करतांना शिक्षक मिळत नसल्यास एफ. डी. पी. च्या मार्गदर्शक तत्वानुसार रु. २५०/ प्रती तासीका प्रमाणे (कमाल रु. १०,०००/ प्रती महीना याप्रमाणे) शिक्षक भरावे असे नमुद आहे त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

Teacher Fellowship करीता निवड झालेल्या शिक्षकास विहित कालावधीमध्ये कार्यमुक्त न केल्यास प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. तद्वतच याबाबत यु.जी.सी. ला सुद्धा कळविण्यात येईल.

आपला विश्वासू

संचालक, म.वि.वि.मं.